लोकमत

# विद्यापीठाच्या सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये प्रवेश सुरू

**कोल्हापूर :** नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) योजनेअंतर्गत एससी, एसटी, ओबीसी, एसईबीसी, ईडब्ल्यूएस (नॉन क्रिमिलेअर) व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि जैन) विद्यार्थ्यांकरिता शिवाजी विद्यापीठ सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत २०१९-२०२० साठी प्रवेश परीक्षा अर्ज मागविण्यात येत आहेत.

या केंद्रामध्ये अर्ज उपलब्ध आहेत. दि. १५ ते २० जुलै या कालावधीत आवश्यक कागदपत्रांसह दुपारी दोन ते सहा यावेळेत सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रात अर्ज जमा करावेत. प्रवेश परीक्षा सोमवारी (दि. २९ जुलै) दुपारी चार ते पाच या वेळेत मानव्यशास्त्र इमारतीमध्ये होणार आहे. विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागांतून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी या केंद्रात संपर्क साधावा, असे आवाहन समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.



स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल रग्बी संघांचा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्र. कुलगुरू, डॉ. डी. टी. शिर्के, क्रीडा विभागप्रमुख पी. टी. गायकवाड, आदी.

# रग्बी स्पर्धेत जिल्हा संघाचे यश

कोल्हापूर टाइम्स टीम

नागपूरमध्ये झालेल्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट रग्बी स्पर्धेत कोल्हापूर जिल्हा रग्बी फुटबॉल असोसिएशनच्या दोन्ही संघांनी यश संपादन केले. मुलांच्या संघाने सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक प्राप्त करून दबदबा कायम ठेवला, तर मुलींच्या संघानेही प्रथम क्रमांक पटकावला. मुलांच्या संघाने वर्धा, सिंधुदुर्ग, ठाणे आणि मुंबई संघाचा एकतर्फी पराभव केला.

मुलींच्या संघाने चंद्रपूर, सांगली, गोंदिया, ठाणे आणि सातारा या संघांचा पराभव करून स्पर्धेत वर्चस्व मिळवले. विजयी संघांचा सत्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के आणि क्रीडा विभागप्रमुख पी. टी. गायकवाड, प्रशिक्षक दीपक पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. असोसिएशनचे पदाधिकारी खासदार संभाजीराजे छत्रपती, माजी आमदार मालोजीराजे छत्रपती, अध्यक्ष अमर सासने, अजित पाटील, शिवाजी मोहिते यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळाले.

# सरनाईक यांची भेट

कोल्हापूर : राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी)वन-महाराष्ट्र बॅटरीचे कमांडंट लेफ्टनंट कर्नल संजीव सरनाईक यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रमाता जिजाऊसाहेब सभागृहात एनसीसीच्या सुमारे ४५० विद्यार्थ्यांसाठी थलसेनापूर्व व संयुक्त वार्षिक कॅम्प झाला. यावेळी कॅम्प कमांडंट म्हणून ले. कर्नल सरनाईक उपस्थित होते. यावेळी मेजर डॉ. रुपा शहा, एनसीसीच्या प्रशासन अधिकारी गुगा मालती उपस्थित होत्या.

# डॉ. येंगडे यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने हॉर्वर्ड केनेडी स्कूलचे संशोधक डॉ. सूरज येंगडे यांचे 'राष्ट्रवाद आणि आंबेडकरवाद' या विषयावर व्याख्यान होणार आहे. बुधवारी (ता. १७ जुलै) साडेदहा वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात व्याख्यान होणार आहे. माणगाव परिषद शताब्दी वर्षानिमित्त या व्याख्यानाचे आयोजन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2019
तरुण भारत

# डॉ. आंबडेकर मिशनतर्फे डॉ. येंगडे यांचे उद्या व्याख्यान

**कोल्हापूर :** डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल मिशनच्यावतीने बुधवार (दि. १७) दुपारी ४.३० वाजता शाहू स्मारक भवन येथे डॉ. सूरज येंगडे यांचे व्याख्यान होणार आहे. आफ्रिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ विटवॉटरसरॅन्ड जोहान्सबर्ग येथे पीएच.डी. करणारे ते पहिलेच भारतीय विद्यार्थी आहेत. डायवर्सिटी व परदेशातील उच्चशिक्षण आणि नोकरीच्या संधी या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तरी विद्यार्थी व प्राध्यापकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# विद्यापीठाच्या सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये प्रवेश सुरू

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** विद्यापीठ अनुदान आयोग, (यूजीसी) नवी दिल्ली योजनेंतर्गत एससी, एसटी, ओबीसी, एसईबीसी, ईडब्ल्यूएस (नॉन क्रिमिलेअर) व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, आणि जैन) विद्यार्थ्यांकरिता शिवाजी विद्यापीठ सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत २०१९-२०२० साठी प्रवेश परीक्षा अर्ज मागविण्यात येत आहेत. आवश्यक कागदपत्रांसह २० जुलैपर्यंत सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्र येथून अर्ज घेऊन जमा करावेत. प्रवेश परीक्षा दि. २९ जुलै रोजी दुपारी चार ते पाच या वेळेत मानव्यशास्त्र इमारतीमध्ये होणार आहे. अधिक माहितीसाठी समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# डॉ. सूरज येंगडे यांचे उद्या व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल मिशन यांच्या वतीने डॉ. सूरज येंगडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. डायवर्सिटी, परदेशातील उच्चशिक्षण आणि नोकरीच्या संधी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची तत्त्वप्रणाली या विषयावर ते विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करणार आहेत. बुधवारी (दि. १७) शाहू स्मारक भवन येथे सायंकाळी ४.३० वाजता हा कार्यक्रम संपन्न होणार असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली. डॉ. येंडगे हे आफ्रिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ विटवॉटसरँड, जोहान्सबर्ग येथून पीएच. डी. करणारे पहिले भारतीय आहेत. सध्या ते अमेरिकेतील हार्वर्ड केनेडी स्कूलमध्ये पोस्ट डॉक्टरल रिसर्च करत आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन संघटनेचे कार्यकर्ते विजय बागडे, संजय सामंत, मनीषा सामंत, धनाजी शाक्य यांनी केले.

# विद्यापीठाच्या सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये प्रवेश सुरू

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विद्यापीठ अनुदान आयोग, (यूजीसी) नवी दिल्ली योजनेंतर्गत एससी, एसटी, ओबीसी, एसईबीसी, ईडब्ल्यूएस (नॉन क्रिमीलेअर) व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, आणि जैन) विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठ सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत २०१९ - २० साठी प्रवेश परीक्षा अर्ज मागविण्यात आले आहेत.

प्रवेश अर्ज सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये उपलब्ध आहेत. दि. १५ ते २० जुलै या कालावधीमध्ये आवश्यक कागदपत्रांसह दुपारी २ ते ६ या वेळेत जमा करावेत.

प्रवेश परीक्षा ही दिनांक २९ जुलै रोजी दुपारी चार ते पाच या वेळेत मानव्यशास्त्र इमारतीमध्ये होणार आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी दिली आहे.

सकाळ

# विद्यापीठाच्या सेवा पूर्वपरीक्षा केंद्रामध्ये प्रवेश सुरू

**कोल्हापूर, ता. १५ :** शिवाजी विद्यापीठ सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत सन २०१९-२०२० साठी प्रवेश परीक्षा अर्ज मागविण्यात आले आहेत. विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारतीमधील सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू आहे. येथून सदरचे अर्ज घेऊन जावेत. एससी, एसटी, ओबीसी, एसईबीसी, ईडब्ल्यूएस (नॉन क्रिमिलेअर) व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि जैन) यांच्यासाठी ही परीक्षा आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, (युजीसी) नवी दिल्ली योजनेअंतर्गत ही परीक्षा घेतली जाते. ही प्रवेश परीक्षा २९ जुलै रोजी दुपारी चार ते पाच या वेळेत मानव्यशास्त्र इमारतीमध्ये होणार आहे. विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर विभागातून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी विभागाच्या दूरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९३७१ वर संपर्क साधावा, असे आवाहन समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.

लोकमत

## प्रशांत माळी : शिवाजी विद्यापीठ, नागरी बँक्स सहकारी असोसिएशनतर्फे व्याख्यान

# सायबर गुन्हेगारी रोखण्यास जागरूक रहा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी जागरुकता आवश्यक आहे. केवळ पासवर्ड बदलून चालणार नाही. प्रत्येकाने सुरक्षितता जपणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सायबर कायदेतज्ज्ञ अ‍ॅड. प्रशांत माळी यांनी रविवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनतर्फे त्यांचे व्याख्यान झाले. 'सायबर सिक्युरिटी' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहातील व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी नागरी बँक्स सहकारी असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे, तर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

अ‍ॅड. माळी म्हणाले, ऑनलाईन बँकिंग व्यवहार सुरक्षितपणे करावेत. त्यातील चुका टाळाव्यात. संघटित सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहेत. त्यामुळे त्याला रोखण्यासाठी प्रत्येकाने जागरुक असणे आवश्यक आहे. प्रत्येकाने सायबर सुरक्षिततेची माहिती जाणून घेतली पाहिजे. डॉ. शिर्के म्हणाले, सायबर सुरक्षिततेची प्रत्येकाला माहिती असावी. विद्यापीठाच्या सायबर सिक्युरिटी सेंटरतर्फे जनजागृतीचे काम सुरु आहे. सर्टिफिकेट कोर्स इन सायबर लॉ फायनान्स सेक्टर सुरु करण्याचा विद्यापीठाचा विचार आहे. निपुण कोरे म्हणाले, नागरी बँकांसाठी सायबर सिक्युरिटीची पॉलिसी सायबर कायदेतज्ज्ञ अ‍ॅड. माळी यांनी निश्चित करून द्यावी. कार्यक्रमास कायदेशीर अधिकारी महेश कदम, महालक्ष्मी बँकेचे उपाध्यक्ष उदय महेकर, आयटी असोसिएशनचे अध्यक्ष ओंकार देशपांडे, अर्बन बँकेचे ज्येष्ठ संचालक शिरीष कणेरकर, महेश चव्हाण, केदार हसबनीस, प्रशांत कासार, डॉ. गजानन राशीनकर, आदी उपस्थित होते. उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. चार्टर्ड अकौंटंट महेश धर्माधिकारी यांनी स्वागत केले. नागरी बँक्स सहकारी असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल नागराळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष कुत्ते यांनी आभार मानले.




शिवाजी विद्यापीठात रविवारी व्याख्यानाचा प्रारंभ सायबर कायदेतज्ज्ञ अ‍ॅड. प्रशांत माळी यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून झाला. यावेळी महेश धर्माधिकारी, निपुण कोरे, डी. टी. शिर्के, ए. एम. गुरव, आदी उपस्थित होते.

### सायबर कायदेतज्ज्ञ माळी म्हणाले,

- बँकांनी 'व्हीएपीटी' टेस्ट, असेसमेंट करुन घ्यावे.
- वाढती सायबर गुन्हेगारी लक्षात घेता बँकांनी विमा पॉलिसी घ्यावी.
- ग्राहकांनी बँकेत नोंद असलेला मोबाईल इतर कोणाला देऊ नये.
- सोशल मीडिया पॉलिसीसाठी समाजातील विविध घटकांनी योगदान द्यावे.
- शैक्षणिक संस्थांनी सायबर सुरक्षितता, सोशल मीडियाच्या वापराबाबत जनजागृती करावी.